MHBU150006182022

नि.क्र. १० लगत

## न्यायनिर्णय

(११/०३/२०२६ रोजी घोषित)

**०१.** खालील मुद्दे माझ्यासमोर उपस्थित झाले. त्यावरील कारण-मिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, दि. १४.०६.२०२२ रोजी ११.०० वाजता मौजे डोड्रा येथे आरोपीच्या ५ लि हातभट्टी दारु विनापरवाना व अवैधरित्या मिळुन आल्या? | **नाही.** |
| ०२. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

**०२.** आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने खालीलप्रमाणे एका साक्षीदारांची साक्ष नोंदविली व इतर कोणतेही साक्षीदार तपासले नाही.

१. सा.क्र.०१ दगडुबा तुकाराम तेजनकर, (पंच),

**०३.** खटला चालवित असतांना आरोपीविरुद्ध गुन्ह्यासंदर्भात काही विधाने आलेली नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

## मुद्दा क्र. ०१ व ०२ करीता

**०४.** आरोपीवरील दोषारोप सिद्ध करतांना अभियोग पक्षाला प्रामुख्याने हे सिद्ध करावे लागेल की, आरोपी हा त्याच्या ताब्यात ५ लि हातभट्टी दारु विनापरवाना अवैधरित्या विक्री करण्याच्या हेतुने बाळगतांना मिळुन आला व त्याच्या ताब्यातुन ५ लि हातभट्टी दारु जप्त करण्यात आली. त्यासाठी अभिलेखावर अभियोग पक्षातर्फे आलेल्या तोंडी पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे आहे. आरोपीच्या कब्जातुन मादक पदार्थ वा द्रव्य मिळाले व जप्त झाले हे प्रस्थापित करण्यासाठी अभियोग पक्षाने

साक्षीदार आणणे आवश्यक होते.

**०५.** सा.क्र. १ ने जप्ती पंच यांनी त्याच्या सरतपासात असे नमुद केले की, दि १४.०६.२०२२ रोजी त्याला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलविले नव्हते. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनांना समर्थन दिलेले नाही. सरकार पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. परंतु अभियोग पक्षास फायदा होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे उपरोक्त नमुद दिनांक दिवशी आरोपीच्या ताब्यातुन ५ लि हातभट्टी दारु आरोपीकडुन जप्त केले असल्याचे अभियोग पक्षाने संशयापलिकडे जाऊन सिध्द केले नाही.

**०६.** प्रस्तुत प्रकरणात कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. घटनास्थळ व जप्ती पंच याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त केला होता याबाबत शंका व्यक्त होते. त्याचप्रमाणे रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर दाखल नाही. दारुबंदी प्रकरणात हे सिद्ध करणे आवश्यक होते की, आरोपीच्या कब्जात मादक द्रव्य अगर तत्सम गुणधर्म असलेले पदार्थ विनापरवाना सापडले होते. त्याबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच विना परवानासाठी अभियोगपक्षाने कोणतेही प्रश्न साक्षीदाराला विचारलेले नाही.

**०७.** सारांश असा की, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५ (ई) अन्वये आरोप सिद्ध होण्यासाठी आरोपीच्या ताब्यात ५ लि हातभट्टी दारु विनापरवाना अवैधरित्या मिळुन आल्या ही बाब अभियोग पक्षाने संशयापलीकडे सिद्ध करणे गरजेचे आहे. परंतु अभियोगपक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन ही बाब संशयापलीकडे सिद्ध होत नाही. अभियोगपक्षाने अभिलेखावर असे कोणतेही दस्त दाखल केले नाही की ज्यावरुन सिद्ध होईल की आरोपी हा अवैधरित्या विनापरवाना दारू विक्री करत होता. एकंदरीत सर्व पुरावे यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अभियोगपक्ष आरोपीविरुद्ध गुन्हा संशयापलीकडे सिद्ध करु शकलेला नाही. करीता मी, मुद्दा क्र. ०१ चा निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवित आहे व मुद्दा क्र. ०२ च्या निष्कर्षाकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

०१. आरोपी **मुकिंदा सुरेश साळवे,** याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५ (ड) च्या दंडनिय अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहीता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपीचा वैयक्तीक मुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

०३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी रु. १५,०००/- किंमतीचा जामीन बंधपत्र सादर करावा.

०४. जप्त मुद्देमाल ५ लि हातभट्टी दारु अपिलाचा कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता राज्य उत्पादन शुल्क, चिखली यांच्याकडे पाठविण्यात याव्यात.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

स्वा/-

दिनांक ११.०३.२०२६

**(हसीम मो. बेग)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २
देऊळगांव राजा.

**Certificate :**

I affirm that, the contents of this PDF File are same words for words, as per the original Order.

Name of Clerk : S.N. Adhao
Name of the Court : Civil Judge Jr.Dn. & J.M.F.C. Deulgaon Raja.
Date of upload : 12/03/2026